# महाराष्ट्र शासन

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई
रॉयल इन्शुरस इमारत,५ वा मजला,१४,जमशेदजी टाटा रोड,चर्चगेट,मुंबई ४०००२०.
दूरध्वनी क्र.२२८२१४१९ फॅक्स क्र.२२८२९९६६ ईमेल- cormumbai@yahoo.com

## शिधापत्रिकांच्या माहीतीचे संगणकीकृत डाटा एंट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी पडताळणी करणेचे कंत्राट

## निविदा सूचना

**नियं**त्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई यांचे कार्यालयामार्फत मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील शिधापत्रिकांच्या माहीतीच्या डाटा एट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी (अंदाजे ४० लाख अर्ज) पडताळणी करणेकामी अशासकीय संस्थाकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे. निविदा फॉर्म विक्री नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे वेळेत रु.५०००/-(रुपये पाच हजार फक्त) चा डिमांड ड्राफ्ट Controller of Rationing& Director of Civil Supplies,Mumbai यांचे नांवे जमा केल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदेच्या अटी व शर्ती या कार्यालयाच्या **www.controllerofrationing.net** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

### कार्यवाहीचा तपशील

| अ क्र | कार्यवाहीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | निविदा फॉर्म विक्री करणे | दि.११/०९/२०१३ ते १६/०९/२०१३ (कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत) |
| २ | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.१७/०९/२०१३ दुपारी ३.०० वाजेपर्यंत (मुदतीनंतरचे फॉर्म स्विकारले जाणार नाहीत) |
| ३ | निविदा उघडणे | दि.१७/०९/२०१३ दुपारी ४.०० वाजता (नियंत्रक शिधावाटप अथवा प्राधिकृत अधिकारी हे निविदाकार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समोर निविदा उघडतील) स्थळ:- नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई यांचे कार्यालय |

टिप: निविदेबाबतच्या अटी व शर्ती निविदा फॉर्म सोबत पुरविण्यात येतील.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,मुंबई

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई
रॉयल इन्शुरस इमारत,५ वा मजला,१४,जमशेदजी टाटा रोड,चर्चगेट,मुंबई ४०००२०.

---

शिधापत्रिकांच्या माहीतीचे संगणकीकृत डाटा एंट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी पडताळणी करणेचे कंत्राटाच्या निविदा बाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे:-

लिफाफा क्रमांक :- १(अ) यात फक्त EMD रकमेचा डी.डी.चा समावेश आहे.

लिफाफा क्रमांक :-२(ब) यात प्रपत्र क्रमांक २ व खालील बाबी संबंधाने आवश्यक कागदपत्रे अंतर्भूत करावित.

१. संस्थेच्या नोंदणीचे प्रमाणपत्र
२. Income Tax Clearance Certificate
३. विविध शासकिय,निमशासकिय कार्यालयात काम केल्याचा अनुभव प्रमाणपत्र
४. संस्थेची profile व उपलब्ध मनुष्यबळाची शैक्षणिक अर्हता बाबत सविस्तर माहीती
५. पॅनकार्ड झेरॉक्स प्रत
६. सेवा कर भरल्याचे प्रमाणपत्र
७. मूल्यवर्धित कर (व्हॅट) भरल्याचे प्रमाणपत्र
८. मागिल आर्थिक वर्षाचा संस्थेचा ताळेबंद अहवाल

लिफाफा क्रमांक :- ३ (क) यात फक्त दर पत्रकाचा (प्रपत्र क्रमांक ३) समावेश असावा.

१. निविदा निश्चित करण्याची कार्यपध्दती:-

(अ) तीन लिफाफ्यापैकी लिफाफा अ- अनामत रकमेचा डी. डी. ब - तांत्रिक लिफाफा आणि क - दराचा लिफाफा राहील . तांत्रिक लिफाफ्यावर ब- तांत्रिक लिफाफा आणि दराच्या लिफाफ्यावर क- दर असे स्पष्ट नमूद करावे. सदर तिन्ही लिफाफे स्वतंत्र लिफाफ्यात मोहरबंद करण्यात यावेत. अ लिफाफा व ब तांत्रिक लिफाफ्यात मागविण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची व निविदेतील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या निविदाकाराच्या बाबतीत दराचा लिफाफा (क) उघडण्यात येईल.

(ब) तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांची पूर्तता निविदा सादर करताना पूर्ण करण्यात यावी. तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर ऐनवेळी कोणतीही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत. तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रात अटी व शर्तीत नमूद केलेल्या अर्हतापेक्षा कमी आढळल्यास निविदा अपात्र ठरतील.

(क) दराच्या लिफाफ्यात (लिफाफा-क) मध्ये फक्त दर नमूद करण्यात यावे. दराची छायाप्रत किंवा दरामध्ये खाडाखोड असल्यास दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही.

(ड) निविदेसोबत किंवा निविदेमध्ये कोणतीही अट किंवा पर्याय देता येणार नाही. असे झाल्यास सदर निविदा विचारात घेतली जाणार नाही.

(ई) तीन पेक्षा कमी पात्र निविदा प्राप्त झाल्यास, निविदा न उघडता अल्प प्रतिसादामुळे (फेर निविदा न काढता) निविदेस ७ दिवसाची मुदतवाढ देण्यात येईल्. व त्यानंतरही ३ पेक्षा कमी ग्राह्य निविदा प्राप्त झाल्यास त्यानंतरची कार्यवाही नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई यांचे समोर निविदाकाराचा लिफाफा उघडण्यात येईल्.

(फ) शिधापत्रिकांच्या माहीतीचे संगणकीकृत डाटा एट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी पडताळणी करणेचे काम मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील संबंधित शिधावाटप कार्यालयात अथवा नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई निश्चित करतील असे अन्य ठिकाणी प्रत्यक्षात करावयाचे आहे.

२. वाटाघाटी करण्याच्या पध्दती

निविदेद्वारे कंत्राटदाराची नियुक्ती करताना सामान्यत: निविदा सूचनेस वर्तमानपत्राद्वारे योग्य प्रकारे व्यापक प्रसिध्दी देऊन निविदांना चांगला प्रतिसाद मिळाला असेल व निविदा पुरेशा स्पर्धात्मक झाल्याची खात्री पटल्यानंतर वैध ठरणाऱ्या न्युनतम दराच्या निविदा स्विकारल्यानंतर निविदेद्वारे प्राप्त झालेले् दर योग्य/वाजवी वाटत नसतील तर तशी कारणे लेखी स्वरुपात नमूद करुन न्युनतम दर देणाऱ्या निविदाकारासोबत वाटाघाटी करुन कंत्राट निश्चित करण्यात येईल. न्युनतम दर देणाऱ्या निविदाकाराबरोबर वाटाघाटी केल्यानंतर सुध्दा प्राप्त झालेले दर योग्य/वाजवी नसतील तर फेर निविदा काढण्यात येतील. ज्या प्रकरणी निविदाकारांनी साखळी केल्याची शंका येईल,त्या प्रकरणी नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई मुळत: निविदा सादर न केलेल्या त्यांच्या माहीतीतील एखाद्या अनुभवी व पात्र निविदाकाराचा समावेश करु शकतील. वाटाघाटी करण्यापूर्वी निविदाकारांना हे स्पष्ट करण्यात येईल की,वाटाघाटी या निविदाकार कोणत्या मर्यादेपर्यंत दर कमी करण्यास तयार आहेत याची तपासणी करण्यासाठी घेण्यात येईल. मात्र वाटाघाटी केल्यानंतर सुध्दा निविदाकारांनी त्यांच्या मूळ निविदेत वा वाटाघाटी दरम्यान केव्हाही देऊ केलेल्या,कोणत्याही दराचा देकार स्विकारण्याचा पर्याय शासनास उपलब्ध राहील.तथापि,आवश्यकतेनुसार न्युनतम निविदाकाराशी व तो तयार नसल्यास अपवादात्मक परिस्थितीत दुसऱ्या न्युनतम निवदाकाराशी वाटाघाटी करुन कमीत कमी दर मंजूर करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यांना राहातील.

३. मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी एकच निविदा

शिधापत्रिकांच्या माहीतीचे संगणकीकृत डाटा एट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी पडताळणी करणेचे कंत्राट निश्चित करण्यासाठी परिमंडळनिहाय निविदा न मागविता मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी एकच निविदा राहील.

४. कंत्राट निश्चित करण्याचे अधिकार

शिधापत्रिकांच्या माहीतीचे संगणकीकृत डाटा एट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी पडताळणी करणेचे कंत्राट खुल्या निविदा पध्दतीद्वारे निश्चित करण्यासाठी नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई हे सक्षम प्राधिकारी आहेत. सक्षम प्राधिकारी हे न्युनतम निविदाकाराबरोबर वाटाघाटी करतील.

५. निविदा फॉर्मची किंमत रुपये ५०००/- (रुपये पाच हजार फक्त) असून सदर फॉर्मची रक्कम राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट Controller of Rationing and Director of Civil Supplies, Mumbai यांचे नांवाने काढून जमा करावा लागेल. त्याशिवाय निविदा फॉर्म मिळणार नाही.

६. शासकिय कामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र - निविदाकारास केंद्रीय वा राज्य शासकिय वा निमशासकिय संस्थेच्या कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव असावा त्याबाबतचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. खाजगी व्यक्तीकडील कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र विचारात घेण्यात येणार नाही.

७. प्रतिभूती ठेव रक्कम- प्रतिभूती ठेवीची रक्कम रुपये ५,००,०००/-(रुपये पाच लाख फक्त) राहील. तसेच काम अपूर्ण सोडून दिल्यास अथवा असमाधानकारक आढळल्यास प्रतिभुतीची रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल.

८. आयकर कपात- आयकर अधिनियम १९६१ च्या कलम १९४ (सी) ची तरतूद लागू होते. या संदर्भात देयकातून केंद्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार व वेळोवेळी झालेल्या बदलानुसार आयकर कपात करण्यात येईल.

९. कोणतीही निविदा संपूर्ण अथवा अंशत: मंजूर करण्याचा किंवा कोणतेही कारण न दाखवता नामंजूर करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. यासंबंधी नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई यांचा निर्णय अंतिम राहील व सर्व निवदाधारकांना बंधनकारक राहील.

१०. कंत्राटदारास कामाचे आदेश दिल्यानंतर तीन दिवसाचें आत शिधापत्रिकांच्या माहीतीचे संगणकीकृत डाटा एट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी पडताळणी करणेचे काम सुरु करणे बंधनकारक आहे. विशिष्ट कारणासांठी आणखी ४ दिवस मुदतवाढ देण्याचे अधिकार नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांना राहतील.

११. शिधापत्रिकांच्या माहीतीचे संगणकीकृत डाटा एट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी पडताळणी करणेचे कामी पुरेश साधनसामग्री व मनुष्यबळाची क्षमता निविदाधारकाकडे असणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार ठिकाण बदलण्याचे अधिकार नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई यांना राहतील.

१२. शिधापत्रिकांच्या माहीतीचे संगणकीकृत डाटा एट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी पडताळणी करणेचे काम कमाल दोन महीन्यात पूर्ण करणे आवश्यक असून ते विहीत मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक राहील. विहीत मुदतीत काम पूर्ण न केल्यास कामाच्या वाढीव कालावधीकरीता शासन नियमानुसार दंड आकारण्यात येऊन ठेकेदाराच्या देयकातून दंडाची रक्कम वसूल करण्यात येईल.

१३. मंजूर निविदाकाराने करारनामा न केल्यास त्याबाबत करावयाची कार्यवाही-

अ) मंजूर निविदाकारास निविदा मंजूर केल्यानंतर ४ दिवसाचे आत सर्व कागदपत्राची पूर्तता करुन रुपये १००/- च्या स्टँप पेपरवर विहीत नमुन्यांत करारनामा करणे बंधनकारक आहे.

ब) मंजूर निविदाकाराने करारनामा न केल्यास अथवा करारनामा करण्यास नकार दिल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करुन लगतच्या न्युनतम निविदाकारास कंत्राट देऊन शासनास जादा खर्च करावा लागणाऱ्या फरकाची वसुली करावयाची रक्कम दोषी निविदाकाराकडून वसूल करण्यात येईल. तथापी काही तांत्रिक कारणास्तव प्रथम न्युनतम निविदाधारक करारनामा करण्यास असमर्थ ठरल्यास व विहीत मुदतीनंतर न्युनतम निविदाकार करारनामा करण्यास तयार असल्यास अशा निविदाकाराशी करारनामा करण्यात येईल.

क) मंजूर निविदाकार करारनामा करण्यास असमर्थ ठरल्यास लगतच्या न्युनतम निविदाकाराची निविदा शासन निर्णयाप्रमाणे निश्चित करण्यात येईल. मात्र लगतचा न्युनतम निविदाकार करारनामा करण्यास तयार नसल्यास निविदा प्रक्रिया रद्द करुन फेरनिविदा मागविण्यात येतील. अशा फेर निवदा प्रक्रियेत पहिल्या निविदेत करारनामा करण्यास नकार देणा-या प्रथम न्युनतम निविदाकारास प्रतिबंधित करण्यात येईल्.

ड) करारनामा करण्यास नकार देणारा निविदाकार हा निविदा सादर केल्यानंतर करारनाम्यातील तरतुदींना बांधील राहील. त्यामुळे लगतच्या न्युनतम निविदाकाराची निविदा मंजूर केल्यामुळे शासनाने

वसुल करावयाची अतिरिक्त रक्कम,स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पी. एल. आर. अधिक दोन टक्के (prime lending rate) व्याजासह करारनामा न केलेल्या निविदाकाराकडून वसूल करण्यात येईल्. सदर वसुली जमीन महसुलीच्या थकबाकीची वसुली म्हणून करण्यात येईल्.

१४. कसूरदार कंत्राटदाराविरुध्द करावयाची कारवाई- कंत्राटदाराची नियुक्ती केल्यानंतर जर कंत्राटदार शिधापत्रिकांच्या माहीतीचे संगणकीकृत डाटा एट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी पडताळणी करणेचे काम करण्यास अयशस्वी ठरला तर प्रसंगानुरुप पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

अ) मूळ नियुक्त कंत्राटदाराच्या नंतर लगतचे उच्च दर देणा-यास दुसऱ्या क्रमांकाच्या निविदाकारास त्याने दिलेल्या दरापेक्षा जास्त नाहीत अशा दराने कामासाठी नियुक्त करण्यात येईल.

ब) जर उपरोक्त अ मध्ये नमूद केलेली कार्यवाही,सदरहू दुसऱ्या क्रमांकाच्या निविदाकाराच्या अनिच्छेमुळे किंवा अन्य कारणांमुळे शक्य नसेल वा नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई यांना ती शक्य वाटत नसेल तर त्याबाबतची कारणे लेखी स्वरुपात नमूद करुन अन्य कोणत्याही निविदाकारास त्यांनी निविदेत देऊ केलेल्या दरानुसार प्राथम्य ठरवून त्यानुंसार त्यांनी दिलेल्या दराच्या अधीन राहून काम सोपविता येईल.

क) वरील दोन्ही बाबी शक्य नसल्यास उपलब्ध कंत्राटदारांमधून मर्यादीत स्वरुपात निविदा मागवून काम सोपविता येईल.

१५. निविदेतील सूचनांबाबत काही शंका असल्यास निविदा सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष कार्यालयात येऊन शंकेचे निरसन करुन घ्यावे. ऐनवेळी कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही तसेच करारनामा करताना सविस्तर पत्ता व दूरध्वनी क्रमांक,भ्रमणध्वनी क्रमांक देणे आवश्यक आहे. याकरीता मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील परिमंडळ कार्यालये व परिमंडळ कार्यालयाशी संलग्न असलेल्या शिधावाटप कार्यालयांशी संपर्क ठेवणे आवश्यक आहे.

१६. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गतशिधापत्रिकांच्या माहीतीचे संगणकीकृत डाटा एट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी पडताळणी करणेचे कामासाठी देयकाच्या १००% रकमेचे प्रदान काम पूर्ण झाल्यानंतर देण्यात येइल.

१७. संस्थेच्या मागील दोन वर्षातील आर्थिक उलाढाल सरासरी रु.१०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) पेक्षा जास्त असणे बंधनकारक राहील.

१८. या अटी व शर्तीमध्ये गरजेप्रमाणे आवश्यक ते फेरफार करणेचे अधिकार नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई यांना राहतील.

१९. या अटी व शर्तींबाबत काही वाद उदभवल्यास हा वाद विभागीय आयुक्त अथवा त्यांनी निर्देशित केलेल्या अधिकाऱ्यांकडे लवाद म्हणून त्यांचेकडेअर्ज करता येईल्. असे लवाद कार्यपध्दतीस the arbitration act मधील तरतुदी लागू राहतील.

ठिकाण-मुंबई

दिनांक

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,मुंबई

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई

(अ)

लिफाफा क्रमांक -१ (प्रपत्र क्र.१)

निविदाधारकालाEMD रक्कम रुपये ५,००,०००/- (रुपये पांच लाख फक्त) चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी.) Controller of Rationing and Director of Civil Supplies, Mumbai यांचे नांवे निविदेसोबत जोडणे बंधनकारक राहील अन्यथा EMD रकमेचा धनाकर्ष न जोडलेली निविदा स्विकृत / विचारात घेतली जाणार नाही. निविदा अटी व शर्तीप्रमाणे निविदाधारकांनी कार्यवाही न केल्यास त्यांची EMD ची रक्कम जप्त करण्यात येईल. EMD रकमेचा धनाकर्ष सादर न केल्यास लिफाफा क्रमांक २ व ३ उघडण्यात येणार नाही.

सर्व सुविधेसह शिधापत्रिकांच्या माहीतीचे संगणकीकृत डाटा एट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी पडताळणी करणेकरीता आवश्यक माहीती.

१. निविदाधारकाचे नांव----------------------------------------------
२. संस्थेचे नांव -------------------------------------
३. संपर्क क्रमांक ------------------------
४. पत्ता--------------------------------------
५. EMD रक्कम रुपये -----------------------------
   डी डी क्रमांक ---------------------दिनांक ----------------रक्कम---------------------
   बँकेचे नांव-------------------------------------------------------

वरीलप्रमाणे सूचना व निविदा फॉर्म सोबत जोडलेल्या अटी व शर्ती हया मी वाचल्या असून निविदेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

दिनांक

निविदाधारकाची सही

कार्यालयीन रबरी शिक्का

पत्ता व दूरध्वनी क्रमांक

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई

(ब) तांत्रिक लिफाफा

लिफाफा क्रमांक -२ (प्रपत्र क्र.२)

१. निविदाधारकाचे नांव---------------------------------------------

२. संस्थेचे नांव ------------------------------------

३. संपर्क क्रमांक -----------------------

४. संस्था नोंदणीचे प्रमाणपत्र व कागदपत्रे-------------------

५. विविध शासकिय अथवा निमशासकिय कार्यालयात काम केलेबाबतचे अनुभव प्रमाणपत्र-------

६. सन २०१२-१३ या वर्षाचे आयकर भरणा केलेचे प्रमाणपत्र---------------------

७. संस्थेचे profile व मनुष्यबळ उपलब्धता-------------------------

८. पॅन कार्ड क्रमांक------------------------------

९. सेवाकर भरल्याचे प्रमाणपत्र (सन २०१२-१३)

१०. मूल्यवर्धीत कर भरल्याचे प्रमाणपत्र (सन २०१२-१३)

११. मागिल आर्थिक वर्षाचा संस्थेचा ताळेबंद अहवाल

दिनांक

निविदाधारकाची सही

कार्यालयीन रबरी शिक्का

पत्ता व दूरध्वनी क्रमांक

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई

(क) दराचा लिफाफा

लिफाफा क्रमांक -३ (प्रपत्र क्र.३)

शिधापत्रिकांच्या माहीतीचे संगणकीकृत डाटा एट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी पडताळणी करणेचे कामाचे दरपत्रक

---

निविदाधारकाचे नांव---------------------

प्रति

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा,मुंबई

महोदया,

मी/संस्थेचा सभासद/संचालक/भागीदार----------------------------------------------पत्ता------------------------------------------------------------आपल्या कार्यालयामार्फत प्रसिध्द झालेली निविदा क्रमांक-------------------------दिनांक -------------दैनिक--------------मध्ये प्रसिध्द झाल्यानुसार निविदा सादर करीत आहे. मी निविदेतील अटी व शर्तीचे वाचन केले असून त्याचे मला संपूर्ण आकलन झालेले आहे. मी तीन लिफाफा पध्दतीनुसार शिधापत्रिकांच्या माहीतीचे संगणकीकृत डाटा एट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी पडताळणी करणेचे कामाचे दर खालील तपशिलाप्रमाणे मोहोरबंद लिफाफ्यात सादर करीत आहे

| अ क्र | कामाचा तपशील | अर्ज पडताळणी प्रति अर्ज सर्व करांसहीत |
|---|---|---|
| १ | शिधापत्रिकांच्या माहीतीचे संगणकीकृत डाटा एट्रीच्या प्रतीतील तपशीलाची शिधापत्रिकांच्या अर्जातील तपशीलाशी पडताळणी करणेचे कामाचे दर | |

---

निविदाधारकाची स्वाक्षरी-----------------------
दिनांक---------------------------------
नांव--------------------
पत्ता----------------------------------
दूरध्वनी क्रमांक-------------------------

शपथपत्र ( रुपये १००/- च्या बॉंड पेपरवर)

दिनांक

प्रति

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा मुंबई

महोदया,

मी----------------------------------- या संस्थेचा संचालक/सभासद/भागीदार------------ या पदावर कार्यरत असून निविदेत दर्शविल्याप्रमाणे उपरोक्त दर्शविलेल्या माहीती जी निविदेत भरलेली आहे ती सत्य आहे.

निविदेमध्ये भरण्यात आलेली माहीती खरी आहे. ती खोटी आढळून आल्यास शासन निर्णयानुसार व भारतीय दंड संहितेनुसार होणाऱ्या शिक्षेस मी/आम्ही पात्र आहोत. म्हणून हे शपथपत्र लिहून देत आहे.

सही

संपूर्ण नांव